**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३२/२०१६-१७/१९५ दिनांक: १७-११-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ३२/२०१६-२०१७**

१) श्री. प्रकाश नामदेव चौगुले :
मु. पो. बागेवाडी
ता. जत, जिल्हा. सांगली

**तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग जत

**विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री प्रकाश नामदेव चौगुले रा. बागेवाडी ता. जत. जि. सांगली यांनी त्यांच्या घर क्र. ३९८ मध्ये नविन वीज जोडणी मिळणेसाठी अर्ज वि.प. यांचेकडे देऊन दि. ०७-०९-२०१४ रोजी रक्कम रु. १५००/- जमा केले. नियमानुसार त्यांना तीन महिन्यात नविन वीज जोडणी मिळाली नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी दि. २४-०८-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे गा-हाणे दाखल केले. तथापि सदर कक्षाने दिनांक १९-१०-२०१६ च्या आदेशाने, तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल असे कळविले. त्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे तक्रारदार या मंचाकडे तक्रार अर्ज घेऊन आले आहेत.

२) वि.प. यानी आपला लेखी खुलासा दाखल केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, तक्रारदार यांना वीज पुरवठा देण्यासाठी दोन पोलची विद्युत वाहिनी आवश्यक आहे. प्रतिक्षा यादीमध्ये तक्रारदार यांचा ४६६ वा क्रमांक आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या परिच्छेद ४.४ नुसार तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दि. १६-११-२०१६ रोजी या मंचासमोर घेणेत आली. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री खापरे यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले. वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री आर.एम. शेमडे यांचा तोंडी युक्तिवाद ऐकला. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचली. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी विलंबा बाबतची भरपाईची मागणी सुनावणीचे वेळी सोडून दिलेली आहे.

४) या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांच्या घरामध्ये नविन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

(२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

५) तक्रारदार यांनी वि.प.कडे अर्ज करुन त्यांच्या नविन घरासाठी नविन वीज जोडणी मिळणेची विनंती करुन दि. ०७-०८-२०१४ रोजी आवश्यक ती रक्कम जमा केली याबद्दल वाद नाही. त्यांना तीन महिन्यात वीज जोडणी देणे प्रचलीत नियमानुसार आवश्यक होते याबद्दलही वाद नाही. वीज जोडणी देण्यासाठी दोन पोलची विद्युत वाहिनी उभारणे गरजेचे आहे याबद्दल मतभेद नाही.

६) वि.प. यांच्याकडे सन-२०१० पासूनची प्रतिक्षायादी प्रलंबित आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. सदर यादीत तक्रारदार यांचा ४६६ वा क्रमांक आहे. तथापी मा. विद्युत नियामक आयोगाच्या कृति मानके विनियमानुसार निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे वि.प.वर बंधनकारक आहे. वीज पुरवठा करण्यासाठी जर काही अडचणी येत असतील तर त्या निवारण करणेसाठी मा. आयोगाकडून मार्गदर्शन , सुचना वगैरे प्राप्त करणे हाच मार्ग वि.प. यांना उपलब्ध रहातो. प्रथम येणा-यास प्रथम वीज पुरवठा हे तत्व न्यायसंगत असले तरी त्याचवेळी कृति मानके विनियमातील तरतूदी दूर्लक्षित करता येत नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांना त्यांच्या घरासाठी वीज जोडणी देणेचाआदेश करणे योग्य होईल असे या मंचास निश्चितपणे वाटते, सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार श्री प्रकाश नामदेव चौगुले रा. बागेवाडी ता. जत जि. सांगली यांना त्यांच्या घर क्र. ३९८ मध्ये नविन घरगुती वीज जोडणी वि.प. यांनी तीन महिन्यात नियमांप्रमाणे द्यावी असा वि. प. यांना आदेश करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |